डॉ. श्री. संजय शामराव डंभारे, प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षकीय सेवा (गट-अ) या पदावरील नियुक्ती रद्द करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः उवतंशि/तांशि -१/३३/१२/१२५/२०१३/भाग-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक -: १६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ:- उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांकः उवतंशि/तांशि -१/ ३३/ १२/ १२५/ २०१३, दि. ०६/०१/२०१७

<u>प्रस्तावना</u>-:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार डॉ. श्री. संजय शामराव डंभारे, यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षकीय सेवा (गट-अ) या पदावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे संदर्भाधिन शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती आदेशामध्ये उमेदवाराने सदर पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजू व्हावे, असे नमूद करण्यात आले आहे. तथापि श्री. डंभारे, यांनी केलेल्या विनंतीस अनुसरून त्यांना दि. ३०/०६/२०१७ पर्यंत रुजू होण्यास मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार श्री. डंभारे यांनी दि. ३०/०६/२०१७ पर्यंत रुजू होणे आवश्यक होते. तथापि ते सदर पदावर अद्यापपर्यंत रुजू झाले नाहीत. त्यामुळे श्री. डंभारे, यांना उपरोक्त पदावर शासन सेवा करण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. या विलंबामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास शासनास सोयीस्कर व्हावे, याकरीता श्री. डंभारे, यांची उपरोक्त पदावरील नियुक्ती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -:

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार डॉ. श्री. डंभारे संजय शामराव यांची प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षकीय सेवा गट-अ या पदावर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये करण्यात आलेली नियुक्ती या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१६१११२३९४७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sameer Laxman Dhere

Digitally signed by Sameer Laxman Dhere
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6ab4a357b0e2247b4328b57f45f509bf1bf0bd20c865128a018421c354bddc5, serialNumber=6ee64cf9b42881125c3715a5db341b5827c5743c728bc85f04bb71ff8fc154d6, cn=Sameer Laxman Dhere
Date: 2017.10.16 11:01:32 +05'30'

(समीर ढेरे)

कार्यासन आधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. डंभारे संजय शामराव, प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.

प्रत,

१. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
४. प्र. सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.
५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२ मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.
८. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (तांशि-१).